# अंबाजोगाईच्या योगेश्वरी देवस्थानला आरडीएक्सने उडवून देण्याची धमकी

■ अंबाजोगाई

**बारा** ज्योतिर्लिंगांपैकी परळी वैद्यनाथ देवस्थानला दोन दिवसांपूर्वी धमकीचे पत्र मिळाले होते. त्यानंतर आता लाखो भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी देवस्थानला आरडीएक्सने उडवण्याचे धमकीपत्र पाठवण्यात आले आहे. त्यामुळे बीडमध्ये एकच खळबळ उडाली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.




**५० लाखांची मागणी केली**

अंबाजोगाईतील योगेश्वरी देवस्थानला मिळालेल्या धमकीपत्रात म्हटले आहे की, आपण फार मोठ्या मंदिर संस्थानचे विश्वस्त आहात. आतापर्यंत आपल्या मंदिराला भरमसाठ देणगी रुपाने रक्कम मिळाली आहे. मी फार मोठा नामी गुंड ड्रग माफिया आहे. मला खासगी व महत्त्वाच्या कामासाठी ५० लाख रुपयांची गरज आहे. हे पत्र मिळताच पत्त्यावर रक्कम पोहोच करावी, अन्यथा मी योगेश्वरी मंदिर माझ्याकडील आरडीएक्सने उडवीन. हे पत्र प्राप्त होताच देवल कमिटीचे सचिव ॲड. शरद लोमटे यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

संस्थानच्या तक्रारीवरुन शहर ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तक्रारीनंतर पोलिसांनी मंदिराला भेट देऊन संपुर्ण मंदिराची पाहणी केली आणि सुरक्षितता राखण्याच्या सुचना दिल्या आहेत.

# बुलेट ट्रेन भूसंपादनात पारदर्शकतेसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती

**डहाणू, प्रतिनिधी-** पालघर जिल्हा नियोजन मंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत बुलेट ट्रेन आणि मुंबई बडोदा एक्सप्रेस महामार्गासाठी करण्यात येणाऱ्या जमिनीचा भूसंपादनाचा मोबदला, शेतकऱ्यांपेक्षा दलालांनाच मिळत असल्याचा आरोप माकपचे डहाणूचे आमदार कॉ.विनोद निकोले यांनी केला होता. त्याची गंभीर दखल पालघर जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी घेऊन न्याय व नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क आणि भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पासाठी भूसंपादन करण्याकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून डहाणू तालुक्यासाठी अपर निवासी उपजिल्हाधिकारी असलेले सुरेंद्र नवले तर तलासरी तालुक्यासाठी उपविभागीय जिल्हाधिकारी असलेल्या अश्विनी मांजे यांना सक्षम भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे.


## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई
## चौकशीची नोटीस

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम, १९५१ चे नियम ७ व ७ अे वाचावे)

**बदल अर्ज क्र.** ACC/VII/325/2021

ज्याअर्थी, **Shree Prabhadevi Vyayam Mandir Nyas,** न्यास नोंदणी क्र. F-648 (Mumbai) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त **Suryakant Krushna Birje** यांनी ACC/VII/325/2021 यामध्ये बदलाकरीता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ यांनी दिनांक ०९.११.२०२१ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे.

त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधित लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप/ हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ यांचेसमोर दाखल करावी. अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अर्जावर दिनांक ०४/०१/२०२२ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४.११.२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
**करिता अधिक्षक (न्याय)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे करिता

कार्यालयाचा पत्ता- धर्मादाय आयुक्त भवन, सास्मिरा,
डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०.

BYP


# जगभरातील टॉप १०० प्रदूषित शहरांत भारतातील तब्बल ४६ शहरांचा समावेश

**नवी दिल्ली-** सध्या राजधानी दिल्लीसह उत्तरेकडील राज्यांमधल्या प्रदूषणाचा मुद्दा देशभर गाजत असताना, जगभरातील टॉप १०० प्रदुषित शहरांमध्ये भारतातील ४६ शहरे शहरांतील नागरिक देखील प्रदूषणाच्या विळख्यात अडकल्याचे चित्र आता समोर आलं आहे. जगभरातील हवेची गुणवत्ता तपासणाऱ्या आयक्यूएअरने प्रदुषित शहराची यादी जाहीर केली आहे. यामध्ये जगभरातील टॉप १०० प्रदुषित शहरांमध्ये भारतातील ४६ शहरं, चीनमधील ४२ शहरांचा समावेश आहे. तर पाकिस्तानमधील ६ आणि बांगलादेशमधील ४ शहरांचा समावेस आहे. इंडोनेशिया आणि थायलँड या देशातील प्रत्येकी एका शहरांचा या यादीत समावेश आहे. या सर्व शहरांतील पीएम २.५ एयर क्वालिटी रेटिंग ५० पेक्षा जास्त आहे. धक्कादायक बाब म्हणजे, जगातील आघाडीच्या दहा प्रदुषित शहरांमध्ये भारतातील ९ शहरांचा समावेश आहे.

भारतातील गाझियाबाद या शहराची हवा सर्वाधिक विषारी आहे. चीनमधील होटान शहराची हवा जगभरात सर्वाधिक विषारी राहिली आहे. या शहराचा पीएम २.५ रेटिंग २०२० मध्ये सरासरी ११०.२ इतका राहिला. भारत, चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशमधील तब्बल ९८ शहरांची हवा अधिक विषारी होत चालली आहे. दिवाळीमध्ये दिल्लतील हवा सर्वाधिक प्रदुषित असल्याचं पाहायला मिळतं. मात्र, दिल्लीप्रमाणेच इतर ४५ शहरांची हवाही दुषित झाल्याचं चित्र निर्माण झाले आहे. काही ठिकाणाची हवा, राहण्यायोग्य नसल्याचेही बोललं जात आहे. प्रदुषणाच्या बाबतीत भारताने चीनला मागे टाकलं आहे. पुढील काही वर्षात ही परिस्थिती न बदलल्यास या शहरांमध्ये राहणं कठीण होणार आहे. त्यामुळे वेळीच उपाययोजना करणं गरचे असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# भरधाव ट्रकची दुचाकीस धडक पत्नी ठार! पती गंभीर जखमी

**चाकण, प्रतिनिधी - कात्रज** येथून दुचाकीवरून आपल्या मूळगावी जाणाऱ्या दाम्पत्याचा चाकण जवळ अपघात झाला. या अपघातात दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून, त्याच्या पत्नीचा ट्रकच्या चाकाखाली येऊन जागीच ठार झाल्या आहेत. पुणे - नाशिक महामार्गावर स्पाईसर चौक, निघोजे येथे रात्री साडे अकराच्या सुमारास हा अपघात झाला. मनिषा मुळुक असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी मयत महिलेचा पती रमेश फकीर शेठ मुळुक (४५) यांनी चाकण म्हाळुंगे चौकी याठिकाणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमेश मुळूक आपल्या पत्नीसोबत दुचाकीवरून आपल्या मूळगावी जात होते. पुणे-नाशिक महामार्गावर स्पाईसर चौक, निघोजे येथे त्यांच्या दुचाकीला ट्रकने ठोकर दिली. यामुळे झालेल्या अपघातात फिर्यादी गंभीर जखमी झाले तर, त्यांच्या पत्नीचा ट्रकच्या चाकाखाली येऊन पत्नीचा जागीच मृत्यू झाला. महाळुंगे पोलीस अधिक तपास करीत आहेत.


## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री. हुसेन बद्रुद्दीन कांटावाला आणि श्री. फिरोझ बद्रुद्दीन कांटावाला यांनी निम्नस्वाक्षरीकारांना निवासी सदनिका क्र. ४०२, ४ था मजला, ओरिऑन, राजा राम मोहन रॉय रोड, जलभॉय सेठ स्ट्रीट, ग्रॅण्ट रोड, मुंबई - ४००००७ व त्यासह एक कार पार्किंग क्र. ०४, मुंबईच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील सर्व बोज्यांपासून मुक्त गिरगाव विभागाचा सी.एस. क्र. ११५० धारण केलेली जमीन हस्तांतरित करण्याचे मान्य केले आहे. सदर सदनिकेच्या संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा हक्क, शीर्षक, हितसंबंध, दावा किंवा मागणी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्याबाबत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात, निम्नस्वाक्षरीकारांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून दहा दिवसांमध्ये सूचित करावे, असे न केल्यास, अशा दाव्यांच्या कोणत्याही संदर्भाशिवाय बोलणी पूर्ण करण्यात येतील आणि दावे जर असल्यास, सोडून दिले किंवा माफ केले असे समजण्यात येईल.

दिनांकः मुंबई
दिनांकः २९ नोव्हेंबर, २०२१
सही/- सौ. प्रिती अमित जैन
सही/- श्री. अमित मांगिलाल जैन
सदनिका क्र. ४०८, ४ था मजला,
शिवदर्शन सोसायटी, धसवाडी लेन,
झावबावाडी, ठाकुरद्वार, मुंबई - ४००००२.



## नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई लिलाव विक्री सूचना
## केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)

सीआयएनः U45400MH2007PTC234297
नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग, चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.
लिलावाचा दिनांक आणि वेळः दि. २०.१२.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. ०२.०० पर्यंत
(प्रत्येकी ५ मिनिटे अमर्यादित विस्तारासह)

मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे दि. २७.१२.२०१९ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकांद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net द्वारे करण्यात येईल. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील, त्यांची राखीव किंमत, ईएमडी रक्कम आणि वाढीव बोली खालील तक्त्यामध्ये देण्यात आल्या आहेतः

| मालमत्ता | राखीव किंमत | ईएमडी रक्कम व तिच्या सादरीकरणाची वेळ | बोलीची विस्तार रक्कम |
|---|---|---|---|
| एनएच-२०३चा किमी ३१.०००, गावः दुर्गादासपूर, पी.ओ. मंगलपूर, जिल्हाः पुरी, पिनकोडः ७५२१०४ आणि छतराम, खोरधा, ओडिशा (लिलाव साइट) च्या येथील कॉर्पोरेट ऋणकोची प्लांट, मशिनरी आणि उपकरणे (मालमत्ता). मालमत्तेशी संबंधित अधिक तपशिल आणि लिलावाच्या अटी आणि शर्तीकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट http://ksspetron.in/liquidation.html येथे उपलब्ध प्रक्रिया दस्तऐवज पहा. | रु. ४,६५,९९,९५०/- | रु. ४६,५९,९९५/- दि. २९.११.२०२१ ते दि. ०८.१२.२०२१ | रु. २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त |

टीपाः

१) ई-लिलावाद्वारे मालमत्तांची विक्री "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" करण्यात येईल.

२) कोणत्याही अधिक माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, सीएस मनिष व्यास यांना +९१ ९६६७०९०१३५ येथे संपर्क साधावा.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता
सही/-
सीएस विनीत के. चौधरी
परिसमापक
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ताः
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९
दिनांकः २९.११.२०२१
ठिकाणः नवी दिल्ली


# सिंधुदुर्गात काळा बिबट्या नंतर आता 'वाघा'चे दर्शन

■ सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यात काळा बिबट्या सापडल्यानंतर आता जिल्ह्यात 'वाघा'चे दर्शनही घडले आहे. सावंतवाडी वन विभागाने लावलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये एका पाळीव जनावराची केलेली शिकार खाताना वाघाचे छायाचित्र टिपले गेले आहे. जिल्ह्यात नुकताच कुडाळ तालुक्यात दुर्मिळ प्रजातीतील काळा बिबट्या दिसून आला. त्यानंतर आता जिल्ह्यातील जंगल क्षेत्रामध्ये वाघाचा वावर असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जिल्हा जैवविविधतेने संपन्न असल्याचे दिसून येते. वाघ हा प्राणी परिसंस्थेच्या सर्वोच्च स्थानावरील वन्य प्राणी असून तो परीपूर्ण जंगलाचे प्रतिक म्हणूनही पाहिला जातो. जिल्ह्यातील या वैनवैभवाचे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्या पाळीव प्राण्यांची वन्यप्राण्यांकडून शिकार झाल्यास तातडीने वन विभागाशी संपर्क साधावा. जेणेकरून आपण शासनामार्फत नमुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देता येईल, असे आवाहन एस.डी. नारनवर, उपवनसंरक्षक सावंतवाडी वन विभाग यांनी केले आहे.

# नगरपंचायत निवडणुकीसाठी काँग्रेस जिल्हाध्यक्षांकडून मुलाखती सुरू

■ मुरबाड, प्रतिनिधी

**मुरबाड** नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२१ या पार्श्वभूमीवर आज ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरगे यांच्या अध्यक्षतेखाली मुरबाड नगरपंचायत निवडणूक साठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांची चाचपणी तसेच मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी दयानंद चोरगे यांनी सांगितले की आगामी नगरपंचायत निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्ष संपूर्ण ताकतीने उतरणार असून मुरबाड मध्ये काँग्रेस पक्षाचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी सर्व १७ जागा लढण्याचा निर्धार व्यक्त केला. मुरबाड नगरपंचायती च्या सर्व जागा लढवण्यासाठी काँग्रेस पक्ष जरी सज्ज झाला असला तरी मागिल निवडणुकीत १७ पैकी ६ जागा लढवून १ नगरसेवक निवडून आणला होता प्रभाग क्र. ६ मध्ये काँग्रेसचा एकमेव नगरसेवक होता मात्र त्याने आता काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भाजप मध्ये प्रवेश केल्याने सर्व नवे चेहरे पाहायला मिळणार आहे.

तर मागिल निवडणुकीत एकूण ३४८ मते काँग्रेसला १० प्रभागातून मिळाले होते. यामुळे मागिल निवडणुकीत भाजपची धुरा सांभाळत विजय मिळवून देणारे दयानंद चोरगे पुन्हा काँग्रेसमध्ये आल्याने काँग्रेस पक्षाला किती बळ मिळते हे काळच ठरवेल मात्र या निवडणुकीसाठी काँग्रेसने आपली ताकद अजमवण्याचा प्रयत्न करत असल्याने वरिष्ठ पातळीवरून महाविकास आघाडी काय निर्णय घेते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the following Share Certificates for 500 Equity shares of FV Rs. 2/- (Rupees Two only) each with Folio No. **HB 0523973** of **HDFC Bank Limited**, having its registered office at HDFC Bank House, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai, Maharashtra, 400013 registered in the name of **Jagdish Anant Warekar** have been lost. **Jagdish Anant Warekar** have applied to the company for issue duplicate certificate. Any person who has any claim in respect of the said shares certificate should lodge such claim with the company within in 15 days of the publication of this notice.

| Folio no. | No. of Shares | Certificate no. | Distinctive Nos From To |
|---|---|---|---|
| HB 0523973 | 500 | 003026391 | 21604221 - 21604720 |

Place : Mumbai
Date : 29/11/2021

Sd/-
Jagdish Anant Warekar



## नवी मुंबई महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्र./ श.अ./ 224 / 2021-2022**

**कामाचे नाव :- यशवंतराव चव्हाण मैदानामध्ये AFC महिला आशियाई फुटबॉल करंडक स्पर्धेकरीता विदयुत व्यवस्थेची दुरुस्ती करणे.**

**अंदाजित रक्कम (रु.). :- 80,44,733/-**

**इसारा अनामत रक्कम रु :- 80,500/-**

या कामाचे कोऱ्या निविदेबाबतची सविस्तर माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in व https://nmmc.etenders.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे . संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/1043/2021



## पश्चिम रेल्वे



### अधिसूचना

**जगजिवन राम रुग्णालय, मुंबई सेंट्रल, पश्चिम रेल्वे येथे वरिष्ठ निवासी या पदाकरिता नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. निवड दि. ०८.१२.२०२१ रोजी वॉक इन इंटरव्ह्यू द्वारे करण्यात येईल. नोंदणीकरण वेळ सूचित दिनांकास ९.०० वा. ते १२.०० वा.**

निर्धारित वेळेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | | प्रति महिना वेतन ₹ मध्ये | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ निवासी | प्रसुती व स्त्रीरोग* | ०१ | ७ व्या सीपीसीची लेव्हल ११ (अंदाजे १,११,००० प्रति महिना) | अनारक्षित-०१ अजा-०१ इमाव-०२ |
| | | गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी | ०१ | | |
| | | सीव्हीटीएस भूलतज्ज्ञ | ०२ | | |
| | | एकूण | ०४ | | |

**ठिकाणः ७ वा मजला, ऑडिटोरियम, जगजिवन राम रुग्णालय, मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४००००८.**

निवड वॉक इन इंटरव्ह्यू प्रक्रियेद्वारे करण्यात येईल. कागदपत्रांच्या पडताळणीनंतर, जे उमेदवार पात्र आढळून येतील फक्त त्यांनाच मुलाखतीकरिता उपस्थित राहू दिले जाईल. **मुलाखतीच्या वेळेस प्रमाणित प्रतींसह सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती सादर कराव्या लागतील.**

**वॉक इन इंटरव्ह्यूकरिता स्वतंत्ररित्या इतर सूचना दिली जाणार नाही.**

**दर्शविलेल्या रिक्त जागा भिन्न असू शकतात आणि** येथे सूचित केलेले पद रिक्त ठेवणे प्रशासनाच्या अखत्यारीत असेल.

**अधित माहितीकरिता www.wr.indianrailways.gov.in येथे न्यूज ॲण्ड रिक्रुटमेन्ट सेक्शनअंतर्गत भेट द्या. कृपया वरील वेबसाईट वरून डाऊनलोड केलेला अर्ज भरून त्यासोबत २ अलिकडची रंगीत प्रकाशचित्रे सोबत आणावी.**

**हाऊस सर्जन्स (क. निवासी) करिता वॉक इन इंटरव्ह्यू रिक्त पदांनुसार प्रत्येक महिन्याच्या २ ऱ्या आणि ४ थ्या मंगळवारी आयोजित केले जातात.**

***टीप:* जगजिवनराम रुग्णालय, प. रेल्वे, मुंबई सेंट्रलच्या वरिष्ठ निवासी आणि हाऊस सर्जन पदे डीएमईआर, महाराष्ट्र, शासनाच्या यूजी/पीजी सर्व्हिस बॉण्डकरिता मान्यताप्राप्त आहेत.**

0565

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly


# ओमिक्रोन व्हेरिएंटचा धोका! केंद्राकडून सर्व राज्यांना नव्या गाईडलाईन जारी

■ नवी दिल्ली

**कोरोनाचा** संसर्ग कमी होतोय असे वाटत असतानाच कोरोनाच्या नव्या प्रजातीने डोके वर काढले आहे. ओमिक्रॉन या नव्या प्रजातीची भीती वाढली असल्याने केंद्र सरकारने राज्यांना नव्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. काल, शनिवारी यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

आंतरराष्ट्रीय प्रवाशांवर, विशेषतः 'हाय रिस्क' देशांतील प्रवाशांवर कठोर पाळत ठेवणे, नियमित तपासणी, कोविड चाचणी, त्यांच्या मागील प्रवासाच्या नोंदी आणि त्यांचे नमुने त्वरित जीनो सिक्वेन्सिंगसाठी पाठवणे, अशा सुचना सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना मुख्य सचिवांना दिल्या गेल्या आहेत.पत्रात राज्यांना कोविड चाचणी पायाभूत सुविधा वाढवण्यासही सांगण्यात आले आहे. त्यामुळे नवीन कोविड विषाणूची कोणतीही लाट आल्यास, सुधारित चाचणी केंद्रे कार्यरत असावीत. काही राज्यांमध्ये RT-PCR चाचण्यांचे प्रमाण कमी झाल्याचे आढळून आले आहे. पुरेशी चाचणी नसल्यास, संसर्ग पसरण्याची खरी पातळी निश्चित करणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे, राज्यांनी चाचण्यांच्या पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि मार्गदर्शक तत्त्वांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच ज्या भागात अलीकडील पॉझिटिव्ह केसेस जास्त आहेत, त्या हॉटस्पॉट्सचे सतत निरीक्षण करणे. सर्व हॉटस्पॉट्समध्ये, चाचण्या करून पॉझिटीव नमुने नियुक्त लॅबमध्ये त्वरीत जीनोम सिक्वेन्सिंगसाठी पाठवण्याचे आदेश दिले गेले आहेत. सर्व राज्यांनी 'टेस्ट-ट्रॅक-ट्रीट-लसीकरण' या तत्त्वाची आणि कोविड योग्य वर्तनाची कठोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी आणि MoHFW मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रतिबंधात्मक उपाय करावे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र.स. आ.पी.उ./ ८५३ /वै.आ.अ./दि.२७.१०.२०२१**

**'ई' निविदा सूचना**

| | |
|---|---|
| **खाते:** | सहाय्यक आयुक्त 'पी/उत्तर' विभाग |
| **उपविभाग:** | वैद्यकीय आरोग्य अधिकारी 'पी/उत्तर' विभागातील मार्वे रोड मुस्लीम |
| **विषय:** | दफनभूमी मध्ये लाकडाचा (बर्गाफळी) पुरवठा करण्याबाबत कालावधीः २ वर्षे ( दोन वर्षे) **Bid No.7200019313** |
| **निविदा विक्री:** | दि.२९.११.२०२१ वेळ:१३.०० पासून दि.०७.१२.२०२१ वेळ:१२.०० पर्यंत |
| **संकेतस्थळ:** | **http://www.mcgm.gov.in** |
| **संपर्क अधिकारी** | डॉ. ऋजुता नि. बारस्कर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी 'पी/उत्तर' विभाग |
| **दुरध्वनी क्र.** | दुरध्वनी क्र. ०२२२९९९४२०० |

सही/-
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पी/उत्तर विभाग**

पीआरओ/१६३२/जाहि./२०२१-२२

**दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदणी करा!**



## नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई लिलाव विक्री सूचना
## पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (परिसमापनामध्ये)

सीआयएनः L45202MH1976PLC019135
नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग, चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.
लिलावाचा दिनांक आणि वेळः दि. २०.१२.२०२१ रोजी दु. ०२.०० ते सायं. ०४.०० पर्यंत
(प्रत्येकी ५ मिनिटे अमर्यादित विस्तारासह)

मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे दि. २३.०१.२०२० रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकांद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net द्वारे करण्यात येईल. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील, त्यांची राखीव किंमत, ईएमडी रक्कम आणि वाढीव बोली खालील तक्त्यामध्ये देण्यात आल्या आहेतः

| मालमत्ता | राखीव किंमत | ईएमडी रक्कम व तिच्या सादरीकरणाची वेळ | बोलीची विस्तार रक्कम |
|---|---|---|---|
| "गेल (इंडिया) लिमिटेड पीओ-पीएटीए, औरैया जिल्हा, उत्तर प्रदेश २०६२४१" (लिलाव साइट) च्या परिसरात स्थित कॉर्पोरेट ऋणकोची प्लांट, मशिनरी आणि उपकरणे (मालमत्ता). मालमत्तेशी संबंधित अधिक तपशिल आणि लिलावाच्या अटी आणि शर्तीकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट http://petronengineering.com/liquidation-process/liquidation-process येथे उपलब्ध प्रक्रिया दस्तऐवज पहा. | रु. १,८०,५३,४४० | रु. १८,०५,३४४/- दि. २९.११.२०२१ ते दि. ०८.१२.२०२१ | रु. २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त |

टीपाः

१) ई-लिलावाद्वारे मालमत्तांची विक्री "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" करण्यात येईल.

२) कोणत्याही अधिक माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, सीएस मनिष व्यास यांना +९१ ९६६७०९०१३५ येथे संपर्क साधावा.

पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता
सही/-
सीएस विनीत के. चौधरी
परिसमापक
पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
liquidatorpecl@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ताः
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९
दिनांकः २९.११.२०२१
ठिकाणः नवी दिल्ली


# बोरिवडेचे जवान संदीप पोवारांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**बोरपाडळे-** पन्हाळा तालुक्यातील बोरीवडे येथील जवान संदीप श्रीपती पोवार यांचा गुरुवारी रात्री त्रिपुरा येथे सेवेत असताना मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव आज गावी बोरीवडे येथे आणण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. जवान संदीप पोवार यांचा मृत्यू सरावा दरम्यान स्वतःच्या शस्त्रानेच झाल्याची माहिती सीमा सुरक्षा दलाचे उप निरीक्षक यु. डी. भट यांनी दिली.

बोरिवडे येथील जवान संदीप पोवार हे ११ वर्षापूर्वी सीमा सुरक्षा दलामध्ये रुजू झाले होते. गुरुवारी सायंकाळी त्यांचा त्रिपुरा राज्यात आगरतळा येथे सेवा बजावत असताना सरावा दरम्यान स्वतः च्या शस्त्राने मृत्यू झाला. आज रविवारी सकाळी त्यांचे पार्थिव बोरीवडे गावात आणण्यात आले. या ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. जवान संदीप पोवार यांच्या पाठीमागे आई, वडील, पत्नी आणि दोन वर्षाची मुलगी असा परिवार आहे. जवान संदीप पोवार यांच्या निधनाने आवळी बोरीवडे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### बांधकाम विभाग

**निविदा सुचना क्र. ८३ (२०२१-२२)**

प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर खालील ३ कामाकरीता बी-१ नमुन्यात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवित आहेत...

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटी शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२९/११/२०२१ ते दि.२३/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा हया दि. २३/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोड करणेत याव्यात. प्राप्त निविदा दि. २४/१२/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

अ.क्र. २ च्या कामासाठी निविदापूर्व बैठक दिनांक १७/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वा. शहर अभियंता कार्यालय, प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण (प.) येथे घेण्यात येईल.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासकांनी राखून ठेवला आहे, याबद्दलचा त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**तळ टिपः** १. मास्क वापरा, सामाजिक अंतर ठेवा, हात धुवा! त्री-सुत्रींचे पालन करा!
२. मी भारताचे भविष्य आहे, मी आता मतदार आहे.

सही/-
**शहर अभियंता**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका,**
**कल्याण.**

कडोंमपा/जसंवि/मुका/७१७
दि. २९/११/२०११